आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१० जानेवारी २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विविध राजकीय पक्षांकडून पुणेकरांना जाहीरनाम्यातून मोफत मेट्रो आणि बस प्रवासाचं आश्वासन

- विरोधकांच्या टीकेनंतर बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सहआरोपी तुषार आपटेचा बदलापूर नगर परिषदेतल्या स्वीकृत नगरसेवक पदाचा राजीनामा

- परीक्षा पे चर्चा या उपक्रमासाठी विक्रमी ४ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी

**आणि**

- बारावीच्या विद्यार्थ्यांना सोमवारपासून हॉल तिकिट डाऊनलोड करता येणार

**<><><><><>**

वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, नागरिकांची बचत करण्यासाठी पुण्यातल्या नागरिकांना मेट्रो आणि बसचा प्रवास मोफत देण्याचं आश्वासन शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं पुणेकरांना दिलं आहे. दोन्ही पक्षांचा संयुक्त जाहीरनामा आज खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत उपमुुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केला. त्यावेळी ते म्हणाले…

**- - - होल्ड - अजित पवार बाइट - - -**

या जाहीरनाम्यात त्यांनी अष्टसुत्री प्रगतीची, अष्टावधानी नेतृत्वाची मांडली आहे. त्यात दररोज नळाद्वारे पाणी, ट्रॅफिक आणि खड्डेमुक्त रस्ते, स्वच्छता आणि सांडपाणी व्यवस्थापन, परवडणाऱ्या दरात दर्जेदार आरोग्य सुविधा, झोपडपट्टी पुनर्वसन, जुन्या इमारतींचा पुनर्विकास यासारखी आश्वासन आहेत. याशिवाय लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी आणि कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या महिलांना ५ लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज, दीडशे पुणे मॉडेल स्कूल, विद्यार्थ्यांना मोफत टॅब, ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी यासारखी आश्वासन यात आहेत.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं पुणे महापालिका निवडणुकीसाठी आज वचननामा प्रकाशित केला. शिवसेना आणि मनसे एकत्रितपणे ही महापालिका निवडणूक लढवीत आहेत. ज्येष्ठ नागरिकांना मोफत औषध सुविधा, महिलांना मोफत पीएमपीचा प्रवास आणि पुणे गुन्हेगारीमुक्त करण्याचा शब्द यात दिला आहे.

<><><><>

अहिल्यानगर शहर विकासाच्या दृष्टीनं राज्यातलं आदर्श शहर बनविण्यासाठी महायुतीने केलेल्या संकल्पास पाठबळ देण्याचे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांिनी केलं. शहरात प्रचाररॅलीत त्या बोलत होत्या. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, रोजगार आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कटीबध्द राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

<><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २ जानेवारी रोजी मुंबई मेट्रोत दिलेल्या मुलाखतीनं आचारसंहितेचा भंग झाल्याची तक्रार काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली आहे. प्रदेश काँग्रेस सरचिटणीस रामकृष्ण शिंदे यांनी ही माहिती दिली.

<><><><>

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणातला सह-आरोपी तुषार आपटे यांनं ठाणे जिल्ह्यातल्या कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेतल्या 'स्वीकृत' नगरसेवक पदाचा राजीनामा दिला आहे. भारतीय जनता पक्षानं काल त्याची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. त्यानंतर विरोधकांनी त्याच्यावर टीका केली होती.

त्या स्वीकृत नगरसेवक म्हणून नेमण्याचा भाजपाचा निर्णय दुर्दैवी असल्याचं मत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी आज मांडलं. तर, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या सह-आरोपीला स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देऊन भाजपानं असंवेदनशीलतेचा कळस गाठला असून, आपलं प्राधान्य कशाला आहे, हे दाखवून दिल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनीही या निर्णयावरून भाजपावर निशाणा साधला आहे. कुटुंबातल्या मुली सुरक्षित ठेवायच्या असतील तर

भाजपला मतदान करू नका, असं आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी याप्रकरणावरुन केलं आहे.

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणाची तक्रार दाखल न केल्याबद्दल संबंधित शाळा व्यवस्थापनाविरोधात गुन्हा दाखल झाला होता. या घटनेनंतर ४४ दिवसांनी संस्थेचा तत्कालीन सचिव आपटे यांना अटक करण्यात आली, आणि ४८ तासांत त्यांना जमीन मंजूर झाला. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यात गहिनीनाथगड आणि पंढरपूर यादरम्यानचा, पालखी सोहळ्यासाठी वापरला जाणारा रस्ता विकसित करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. गहिनीनाथगडावर वामनभाऊ महाराज यांच्या ५०व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गहिनीनाथगडानं दूरदूरच्या नागरिकांना अध्यात्माशी जोडलं, असं ते यावेळी म्हणाले. गहिनीनाथगडाच्या विकासासाठीही राज्य सरकारनं योजना तयार केली असून त्याचं काम सुरू असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

<><><><><>

विकसित भारत जी रामजी कायद्यात या योजनेचा ४० टक्के आर्थिक भार राज्यांवर टाकला आहे. त्यामुळं आर्थिक अडचणीत असलेली राज्यं याची अंमलबजावणी करू शकणार नाही असा दावा जालन्याचे खासदार कल्याण काळे यांनी आज केला. यामुळं ग्रामीण बेरोजगारी आणि स्थलांतर वाढून ग्रामविकासाला मोठा फटका बसेल, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पाच्या निमित्ताने राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांशी चर्चा केली. नवी दिल्लीत झालेल्या या चर्चेत केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारीला सुरू होणार आहे.

<><><><><>

युवा पिढीला परीक्षेच्या तणावापासून मुक्त करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या ‘परीक्षा पे चर्चा’ कार्यक्रमाने देशव्यापी चळवळीचं स्वरूप घेतल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र

प्रधान यांनी म्हटलं आहे. परीक्षा पे चर्चा २०२६ मध्ये ऑनलाईन माध्यमातून सहभागी होण्यासाठी यंदा ४ कोटीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या ३ कोटी ५० लाखांपेक्षा जास्त नोंदणीच्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डला मागे टाकल्याचं त्यांनी म्हटलं आहे. 'परीक्षा पे चर्चा' हे बहुप्रतिक्षीत व्यासपीठ विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना एकत्र येऊन प्रधानमंत्र्यांशी थेट संवाद साधण्याची संधी देतं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना येत्या सोमवारपासून ऑनलाईन पद्धतीने हॉल तिकिटे उपलब्ध करून दिली जातील. या हॉल तिकिटावर मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचा शिक्का आणि स्वाक्षरी असणे बंधनकारक असल्याची माहिती माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली आहे.

**<><><><><>**

सार्वजनिक आरोग्य विभागात कार्यरत अधिकाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती कामगिरीवर आधारित मूल्यांकन अहवालानुसार पारदर्शकपणे करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. ते आज मुंबईत याबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होते. नागरिकांना आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे देण्यासाठी सीएसआर देणाऱ्या संस्थांना प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आबिटकर यांनी दिल्या.

**<><><><><>**

कायद्याचं उल्लंघन करून सेवा शुल्क आकारल्याबद्दल देशातल्या २७ उपाहारगृहांविरोधात सीसीपीए, अर्थात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं कारवाई केली आहे. या उपाहारगृहांना ५० हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात आला असून, ग्राहकांना सेवा शुल्काची रक्कम परत करण्याचे आणि आपल्या बिलिंग प्रणालीमध्ये बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. यात मुंबईतल्या काही रेस्टॉरंटचा समावेश आहे. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत, सेवा शुल्काची अनिवार्य आकारणी, ही अनुचित व्यापार पद्धत म्हणून घोषित करण्यात आली असून, सरकारी हेल्पलाईन नंबरवर ग्राहकांनी केलेल्या तक्रारीवरून सीसीपीएनं ही कारवाई केली.

<><><><><>

मुंबईच्या गोरेगाव भागात भगतसिंह नगर इथं लागलेल्या आगीत तीन जण मृत्यूमुखी पडले, तर तीन जण जखमी झाले. आज पहाटे तीनच्या सुमाराला ही घटना घडल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

महिला प्रीमियर लीगच्या आजच्या सामन्यात गुजरात जायंट्सनं यूपी वॉरियर्सचा १० धावांनी पराभव केला. नवी मुंबई इथं झालेल्या या सामन्यात आधी फलंदाजी करताना गुजरातनं ४ खेळाडू गमावून २०७ धावांचा डोंगर रचला. प्रत्युत्तरादाखल यूपी वॉरियर्स संघाला ८ खेळाडूंच्या मोबदल्यात १९७ धावाच करता आल्या.

//<><><><><>//

-